**नियमित दिवाणी दावा क्र. ७४/२०१७ मधील**
**निशाणी क्र. ५ खालील आदेश**
(पारित दिनांक ३०/०४/२०१९)

वादीने प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. ५ प्रतिवादी क्र. २ ते ६ यांनी वादीच्या ताब्यातील दावा मिळकतीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अथवा अडथळा करु नये अशा तुर्तातुर्त मनाई हुकुमासाठी दिलेला आहे.

२. वादीने अर्जामध्ये असे कथन केले आहे की, वादपत्रातील दावा मिळकती या मुळच्या कै. गौरू बाबाजी झाडाणे उर्फ मोरे यांच्या मालकी वहिवाटीच्या असुन दावा कलम १अ मधील मिळकती कै. गौरू बाबाजी झाडाणे यास वारसहक्काने प्राप्त झालेल्या आहेत व दावा कलम १ब मधील मिळकती कै. गौरू बाबाजी झाडाणे यांना कुळहक्काने मिळालेल्या आहेत. कै. गौरू झाडाणे यांनी दावा कलम १क मधील मिळकती या शेतीच्या व्यवसायातून खरेदी केलेल्या आहेत. कै. गौरू झाडाणे यास दोन पत्नी होत्या व कै. गौरू झाडाणे यांनी दावा कलम १ड मधील मिळकती पहिली पत्नी कै. बयोबाई झाडाणे हिच्या नावे दिनांक १३/०५/१९४९ रोजी खरेदी घेतलेल्या आहेत, तसेच दावा कलम १इ मधील दावा मिळकती दुसरी पत्नी कै. काशी झाडाणे हिच्या नावे दिनांक २४/०२/१९४८ रोजी खरेदी घेतलेल्या आहेत व दावा कलम १फ मधील मिळकती या त्यांचा मुलगा राजाराम याच्या नावे दिनांक १४/०५/१९५७ रोजी खरेदी घेतलेल्या आहेत. दावा कलम १ड, १इ व १फ या मिळकती या कै. गौरू झाडाणे यांनी एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातून खरेदी केलेल्या आहेत.

३. कै. गौरू बाबाजी झाडाणे हे मयत झाल्यानंतर दावा मिळकतीस वादी व प्रतिवादी यांच्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी झालेली आहे. कै.

गौरू झाडाणे त्यांच्या मृत्यूनंतर दावा मिळकती या वादी व प्रतिवादी आपापसातील समजुतीने कसत होते. वादी हे दावा कलम १क मधील मिळकत सर्व्हे नंबर ६०/४अ/२, ६०/८, ४४/६, ४७/३३ या मिळकती कसतात व भाताचे पीक घेतात, तसेच प्रतिवादी क्र. १ ते ४ व त्यांचे पुरोगामी राजाराम झाडाणे हे दावा कलम १ब मधील मिळकती कसत आहेत. दावा कलम १अ, १ड, १इ व १फ या मिळकती वादी व प्रतिवादी एकत्रित कसत आहेत. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये अद्याप निरतुटक हिस्सेवारीने वाटप झालेले नाही. दावा मिळकती या महसूल दप्तरी वादी व प्रतिवादी क्रमांक १ ते ६ यांच्या नावे नोंदविण्यात आलेल्या आहेत, त्यामुळे दावा मिळकतीचे आजपर्यंत हिस्सेवारीने वाटप झालेले नाही. सबब वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा कलम १ड, १इ व १फ या मिळकती एकत्र कुटूंबाच्या मालकीच्या आहेत असे जाहीर करुन मिळण्यासाठी, दावा मिळकतीमधील वादीचा १/५ इतका हिस्सा निरतुटक करुन कब्जा मिळण्यासाठी, वाटपासाठी व प्रतिवादी क्र. २ ते ६ यांनी वादीच्या दावा मिळकतीमध्ये अडथळा अथवा हस्तक्षेप करु नये असा निरंतर ताकदीचा आदेश करुन देण्यासाठी दाखल केला.

४. दिनांक १५/०३/२०१६ रोजी वादी दावा कलम १ड मधील शेतजमीन मिळकतीमध्ये काम करीत असताना सकाळी ९.०० वाजण्याच्या सुमारास प्रतिवादी क्र. २ ते ६ यांनी वादीस हरकत अडथळा केला व वादी दावा कलम १ड मधील मिळकतीमध्ये शिरल्यास ठार मारण्याची धमकी दिली, त्यामुळे वादीने दिनांक ०१/०४/२०१६ रोजी प्रतिवादी क्र. २ ते ६ यांना वकिलांमार्फत नोटीस पाठवून वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा न करण्याचे कळविले, परंतु प्रतिवादीने वादीचे ऐकले नाही. सबब वादीस प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. ५ दाखल करणे भाग पडले. सबब प्रतिवादी क्र. २ ते ६ यांनी वादीच्या ताब्यातील दावा मिळकत १ड यामध्ये हस्तक्षेप अथवा अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी

दाखल केला.

५. दावा दाखल केल्यानंतर दाव्याचे समन्स मिळून देखील प्रतिवादी क्र. २ ते ७ यांनी मुदतीत म्हणणे व लेखी कैफियत दाखल केली नाही. सबब प्रतिवादी क्र. २ ते ७ यांच्याविरुध्द प्रस्तुत दावा विना म्हणणे व विना कैफियत चालविण्यात आला. प्रतिवादी क्र. १, ८ व ९ ते १४ यांनी पुरशीस दाखल करुन वादीचा दावा मान्य केला.

६. अर्ज निशाणी क्र. ५, वादपत्र व कागदपत्राचे अवलोकन करता व वादीचा युक्तिवाद ऐकला असता प्रस्तुत अर्जाच्या निर्णयासाठी पुढील मुद्दे उपस्थित होवून त्यांचे निष्कर्ष कारणमीमांसेसहित पुढीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीच्या हक्कात सकृतदर्शनी केस आहे काय? | होय. |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या हक्कात आहे काय? | होय. |
| ३. | मनाई हुकुमाचा आदेश न झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | होय. |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## :: का र ण मी मां सा ::

७. प्रस्तुत कामी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीतर्फे विद्वान वकील श्रीमती सारिका पालकर यांचा युक्तिवाद ऐकला. वादीचे विद्वान वकील

श्रीमती पालकर यांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबातील वडिलोपार्जित मिळकती आहेत व सदरच्या मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या नावे महसूल दप्तरी नोंद झालेल्या आहेत, त्यामुळे वादी व प्रतिवादी हे दावा मिळकतीचे सह-हिस्सेदार असुन दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये सरसनिरस निरतुटक वाटप झालेले नाही. वादी दावा कलम १क मधील दावा मिळकती कसतो व त्यामधुन भाताचे पीक घेतो. प्रतिवादी क्र. १ ते ४ हे दावा कलम १ब मधील मिळकती कसतात व दावा कलम १अ, १ड, १इ व १फ या मिळकती वादी व प्रतिवादी एकत्र कसतात. प्रतिवादी क्र. ४ संतोष राजाराम झाडाणे हा गावामध्ये राहत नसुन तो पोलादपुर येथे राहतो व दावा मिळकत तो मक्त्याने कसतो. दिनांक १५/०३/२०१६ रोजी वादी दावा कलम १क मधील मिळकतीमध्ये मशागत करीत असताना प्रतिवादी क्र. २ ते ६ यांनी वादीच्या मशागतीस अडथळा केला व जमिनीमध्ये घुसल्यास ठार मारण्याची धमकी दिली. वादी यांचे वय हे ७७ वर्षे असल्यामुळे प्रतिवादी क्र. २ ते ६ हे वादीस दमदाटी करुन वादीस दावा मिळकतीच्या कब्जामधुन बाहेर काढण्याच्या तयारीत आहेत. सबब प्रस्तुतचा अर्ज वादीस दाखल करणे भाग पडले आहे.

८. दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या नावे महसूल दप्तरी नोंद असल्यामुळे वादी व प्रतिवादी हे दावा मिळकतीचे सह-हिस्सेदार आहेत. दावा मिळकतीचे कधीही सरसनिरस निरतुटक वाटप झालेले नाही. दावा मिळकत कलम १क ही वादीच्या ताबेकब्जात आहे. सबब प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुने आहे. वादी दावा मिळकत कलम १क च्या कब्जात असल्यामुळे न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे. वादीस तुर्तातुर्त मनाई हुकूम न दिल्यास वादीचे पैशाने कधीही न भरून येणारे नुकसान होईल याउलट तुर्तातुर्त मनाई हुकूम पारित केल्यास प्रतिवादी क्र. २ ते ६ यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

९. तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा आदेश करीत असताना सकृतदर्शनी केस कोणाचे बाजूने आहे? न्यायाचा समतोल (balance of convenience) कोणाचे बाजूने आहे ? व तुर्तातुर्त आदेश न दिल्यास वादीचे पैशांनी न भरुन येणारे नुकसान होणारे आहे काय ? या तीन बाबी विचारात घेणे आवश्यक असते.

**<u>मुद्दा क्र. १ बाबत</u> :-**

१०. वादीचा युक्तिवाद बारकाईने लक्षात घेता व कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसते की, निशाणी क्र. ३/१ कडे दाखल केलेल्या दावा मिळकतीच्या ७/१२ उता-यामध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ ते ७ यांची नावे भोगवटादार या सदरी नोंद झालेली आहेत. सबब प्रथमदर्शनी वादी व प्रतिवादी क्र. १ ते ७ हे दावा मिळकतीचे सह-हिस्सेदार असल्याचे दिसुन येते.

११. वादीचे दाव्यात स्पष्टपणे असे कथन आहे की, कै. गौरू झाडाणे मयत झाल्यानंतर दावा मिळकती वादी व प्रतिवादी हे आपापसातील समजुतीने कसत होते. वादी दावा कलम १क मधील दावा मिळकती कसतो व त्यामधुन भाताचे पीक घेतो. प्रतिवादी क्र. १ ते ४ हे दावा कलम १ब मधील मिळकती कसतात व दावा कलम १अ, १ड, १इ व १फ या मिळकती वादी व प्रतिवादी एकत्र कसतात. प्रतिवादी क्र. २ ते ६ यांनी प्रस्तुत अर्जास लेखी म्हणणे व लेखी कैफियत दाखल न केल्यामुळे वादी दावा कलम १क मधील मिळकत कसत असल्याचे कथन विना आव्हानीत राहिलेले आहे. प्रतिवादी क्र. २ ते ६ यांनी मुदतीत लेखी म्हणणे व कैफियत दाखल न केल्यामुळे वादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनावर अविश्वास ठेवण्यास मला कोणतेही कारण दिसुन येत नाही.

१२. वादीने निशाणी क्र. ५३ कडे प्रतिवादी क्र. २ ते ६ यांना वकिलामार्फत पाठविलेली दिनांक ०१/०४/२०१६ रोजीची नोटीस अभिलेखावर

दाखल केलेली आहे. सदर नोटीसीचे अवलोकन करता असे दिसुन येते की, सदर नोटीसीमध्ये दावा मिळकत सर्व्हे नंबर ६०/४अ/२, ६०/८, ४४/६ व ४७/३३ या मिळकती वादी गेली १५ वर्षे कसत असल्याचे व भाताचे पीक घेत असल्याचे नमुद केल्याचे दिसुन येते व वादीने सदर नोटीसीद्वारे प्रतिवादी क्र. २ ते ६ यांना वादीच्या वहिवाटीस कोणत्याही प्रकारची हरकत अथवा अडथळा करु नये अन्यथा वादीस दिवाणी स्वरुपाचा दावा करणे भाग पडेल असे प्रतिवादी क्र. २ ते ६ यांना कळविल्याचे दिसुन येते. सबब वादी दावा मिळकत कलम १क या मिळकतीच्या कब्जेवहिवाटीत असल्याचे दिसुन येते. तुर्तातुर्त मनाई हुकुमाच्या अनुषंगाने वर नमुद बाबींचा विचार करता वादीने सकृतदर्शनी केस शाबीत केली आहे. सबब मुद्दा क्र. १ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u> :-**

१३. दावा मिळकतीस वादी हा सह-हिस्सेदार आहे व वादी हा दावा मिळकत कलम १क मधील मिळकतीच्या ताबेकब्जात असल्यामुळे व प्रतिवादी क्र. २ ते ६ यांनी दिनांक १५/०३/२०१६ रोजी वादीच्या कब्जेवहिवाटीस अडथळा केल्यामुळे व वादीस धमकी दिल्यामुळे न्यायाचा समतोल (balance of convenience) हा वादीच्या हक्कात आहे. सबब मुद्दा क्र. २ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ बाबत</u> :-**

१४. मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्षांचा विचार करता, सद्यस्थितीमध्ये वादी हा दावा मिळकतीचा सह-हिस्सेदार व दावा मिळकत कलम १क चा मिळकतीचा कब्जेदार असल्याचे दिसुन येते. सबब वादीच्या हक्कात मनाई हुकूम न दिल्यास प्रतिवादी क्र. २ ते ६ हे बेकायदेशिररित्या वादीच्या कब्जे वहिवाटीस अडथळा करुन

वादीस दावा मिळकत कलम १क च्या ताबेकब्जामधुन काढून टाकतील व वादी हा ७७ वर्षे वयाचा असल्यामुळे साहजिकच वादीचे पैशाने न भरुन येणारे असे नुकसान होईल. याउलट मनाई हुकूम वादीच्या बाजुने दिल्यास व प्रतिवादी क्र. २ ते ६ यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब मुद्दा क्र. ३ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. ४ संदर्भात :-**

१५. मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष मी होकारार्थी नोंदविले असल्यामुळे वादीच्या हक्कात तुर्तातुर्त मनाई आदेश देणे योग्य होणार आहे. सबब पुढील आदेश.

## : आदेश :

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र. २ ते ६ यांनी स्वत: अथवा इतरांमार्फत दावा मिळकत कलम १क या शेतजमीन मिळकतीमध्ये वादी यांच्या कब्जे वहिवाटीस हरकत अथवा अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम प्रतिवादी क्र. २ ते ६ यांच्याविरुध्द पारित करण्यात येतो.

३) प्रस्तुत अर्जाचा खर्च हा मुळ दाव्याच्या खर्चात समाविष्ट करण्यात येईल.

महाड.
दिनांक : ३०/०४/२०१९

(वि. रा. डोईफोडे)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर
महाड.

# प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या आदेश/न्यायनिर्णयातील शब्द नि शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | मंदार चंद्रकांत दिवेकर |
| न्यायालयाचे नाव | श्री. द. वि. कुटे, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, अलिबाग, महाड-कॅम्प. |
| आदेश/न्यायनिर्णयावर पिठासीन अधिका-यांनी स्वाक्षरी केल्याचा दिनांक | ३०/०४/२०१९ |
| आदेश/न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | ०२/०५/२०१९ |